# ते काम शोधत होते, अन् मृत्यूने त्यांना शोधले!

## मंगरुळ चव्हाळा येथील 2 चिमुकल्यांसह तिघे पुण्यात ठार









**महासागर प्रतिनिधी**

*अमरावती, ( दि.23 ) - जिल्ह्यात हाताला काम मिळत नसल्याने कामाच्या शोधात वणवण भटकंती करणारे अनेक मजूरांचा विविध अपघातामध्ये मृत्यू होण्याच्या घटना जणू नित्याच्याच झाल्या आहे. काही महिन्यांपुर्वी बुलढाणा तालुक्यातील नांदुरा ते मलकापूर मार्गावरील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 6 काम करणाऱ्या मजूराच्या झोपडीत भरधाव ट्रक शिरल्याने मेळघाटातील तीन मजूरांचा मृत्यू झाला होता, अनेकवेळा कामाच्या शोधाची भटकंती या मजूरांना मृत्यूच्या शेवटावर पोहोचविते. रविवार-सोमवारच्या रात्री पुण्यातील वाघोली पोलीस स्टेशन समोरील परिसरात फुटपाथवर झोपलेल्या नऊ जणांना टिप्परने चिरडले. या हिट-अँड-रन प्रकरणात अमरावती जिल्ह्यातील मंगरूळ चव्हाळा येथील तिघांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये दोन चिमुकल्या भावंडांचा समावेश आहे. हे कुटूंब रविवारीच कामाच्या शोधात पुण्यात दाखल झाले होते. मात्र मृत्यूने त्यांचा शोध घेतला.*

वैभवी रितेश पवार (वय 1 वर्ष) वैभव रितेश पवार (अडिच वर्ष) आणि विशाल विनोद पवार(वय 30, सर्व रा. मंगळुर चव्हाळा) या तिघांचा मृतांमध्ये समावेश आहे. अपघातातील सहा जणांची प्रकृती गंभीर आहे. त्यांच्यावर ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत. भटकंती करणाऱ्या समुहातील हे कुटूंब होते. मंगरूळ चव्हाळा येथील एकाच कुटूंबातील नातेवाईक आदल्या रात्री कामाच्या शोधात पुण्यात गेले होते. निवारा नसल्यामुळे ते सर्वजण गारठणाऱ्या थंडीत बाहेर फुटपाथवर झोपले होते. दरम्यान दारूच्या नशेत असलेल्या टिप्परच्या चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले, त्याने डंपर झोपलेल्या नागरिकांच्या अंगावर चढविला. त्यामुळे हा भीषण अपघात झाला. दरम्यान या घटनेमुळे पुण्यासह अमरावतीतही संतापाची लाट उसळली आहे.

### गंभीर जखमींमध्ये यांचा समावेश

जानकी दिनेश पवार (वय 21), रिनिशा विनोद पवार (वय 18), रोशन शशादू भोसले (वय 9), नगेश निवृत्ती पवार (वय 27), दर्शन संजय वैराळ (वय 18) आलिशा विनोद पवार (वय 47) अशी सहा गंभीर जखमींची नावं आहेत. त्यांना ससून रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. आरोपी डंपर चालक गजानन शंकर तोट्रे याने मद्यपान केल्याचे तपासात समोर आले असून त्याच्या विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### आक्रोश आणि किंकाळ्या

प्रत्यक्षदर्शीच्यानुसार कडाक्याच्या थंडीत हे कुटूंब एकमेकांना टेकुन फुटपाथवर झोपले होते. हे दोन्ही मृतक बाळ आणि युवक फुटपाथच्या एका बाजुला झोपले होते. अचानक डंपर मृत्यू बनून आले, आणि यांना चिरडत गेला. घटनेनंतर घटनास्थळावर एकच आक्रोश आणि किंकाळ्या ऐकायला येत होत्या. अपघातात बळी ठरलेले तिघांसह सर्व जखमी जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यात येणाऱ्या मंगरूळ चव्हाळा येथील आहेत.



# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते करीना थापाचा सत्कार



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.23 )-** अपार्टमेंटमध्ये लागलेल्या आगीमध्ये सिलींडरचा स्फोट होण्यापासून रोखणाऱ्या आणि 70 कुटुंबाचे रक्षण करणाऱ्या करीना थापाचा जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी सत्कार केला. यावेळी करिना थापाला शिक्षण आणि खेळासाठी सर्वोतोपरी मदत करण्यात येईल, असे आश्वासन जिल्हाधिकारी कटियार यांनी दिले. तसेच तिच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी निवड

### गुरूवारी राष्ट्रपतींच्या हस्ते दिल्लीत गौरव

जिल्हाधिकारी कार्यालयात कटियार यांनी करिना आणि तिच्या कुटुंबियांशी संवाद साधला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. कटियार यांनी थापा कुटुंबियांची माहिती घेतली. करीना हिची शैक्षणिक माहिती तसेच खेळातील अभिरूचीबाबत माहिती घेतली. बॉक्सींग खेळात तिचे प्राविण्य असल्याने जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे तिला योग्य ती सर्व मदत करण्यात येईल, असे आश्वासन दिले. करीनाने शिक्षण आणि खेळामध्ये मेहनत करावी, खेळामध्ये सुरवातीच्या काळात मदत मिळणे कठिण असते, त्यामुळे जिल्हा प्रशासनातर्फे तिला पूर्ण मदत करण्यात येईल, असे सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी यांनी करिना हिचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. तसेच भेटवस्तूही दिल्या. करीनाच्या धाडसाची दखल घेत केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालयाने प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी करीनाची निवड केली आहे. तिला राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रपती भवनात गुरूवार, दि. 26 डिसेंबर रोजी समारंभपूर्वक गौरविण्यात येणार आहे. पदक, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

# मुलीच्या व्हॉटसॲपवर पाठविला अश्लील मेसेजसह पॉर्न व्हिडीओ

### अल्पवयीन मुलीला शरीर सुखाची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.23 )-** एका अल्पवयीन मुलीच्या मोबाईलवर एका तरुणाने अश्लिल मेसेस पाठवून तिला शरिर सुखाची मागणी केली. इतकेच नव्हे तर तिच्या मोबाईल क्रमांकावर पार्न व्हीडीओही पाठविला. या घटनेची तक्रार पिडित मुलीने 22 डिसेंबर रोजी दत्तापूर पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी गौरव अरुन हातमोडे (25, रा. पुलगाव, ता. देवळी) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

पिडितेच्या तक्रारीनुसार ती तिच्या परिचयातील एका मुलीच्या घरी असताना, तिच्या मोबाईल क्रमांकावरील व्हॉटसॲपवर काही संदेश प्राप्त झाले. मुलीने चॅटींग करून कोण आहे, असे विचारले. त्यानंतर मुलीने स्कीन शॉट काढून ठेवले. त्यानंतर मुलीच्या मोबाईलवर आणखी एका क्रमांकावरून पॉर्न व्हीडीओ प्राप्त झाले. त्यानंतर मुलीने हा प्रकार आपल्या आईला सांगितला. त्यानंतर पिडित मुलीने या घटनेची तक्रार दत्तापूर पोलिस ठाण्यात दिली.

# घरात बंद करून विवाहितेला ठेवले उपाशी

## सरमसपुरा ठाण्यात सासरच्या मंडळीविरुध्द गुन्हा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.23 ) -** पाच लाख रुपयांची मागणी करून एका विवाहितेचा शारिरिक व मानसिक छळ केला आणि तिला घरात डांबून ठेवत जेवायला सुध्दा दिले नाही. या घटनेची तक्रार 22 वर्षीय पिडित महिलेने 22 डिसेंबर रोजी सरमसपुरा पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी सुमित मोहन स्वर्गे (30(, मोहन भिमराव स्वर्गे (58), वैभव मोहन स्वर्गे (27) व दोन महिला (सर्व रा. अचलपूर) यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

22 वर्षीय तरुणीचे स्वर्गे कुटुंबातील मुलासोबत लग्न झाले. त्यावेळी दोन महिने विवाहितेला चांगली वागणूक देण्यात आली. परंतू त्यानंतर विवाहितेचा शारिरिक व मानसिक छळ सुरु झाला. तिला मारहाण करणे सुरु झाले. दरम्यान लग्नाचा खर्च पाच लाख रुपये आणण्याचा तगादा सासरच्यांनी लावला. 20 डिसेंबर रोजी पतीने पत्नीला शिविगाळ करून मारहाण केली. त्यानंतर घरात बंद करून जेवायला दिले नाही. हा प्रकार पाहून पिडित विवाहितेने सरमसपुरा पोलिस ठाणे गाठून सासरच्या मंडळीविरुध्द तक्रार दिली.

# महिलेसह अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.23 ) -** एका महिलेला बदनामीची धमकी देऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची घटना पथ्रोट येथे उघडकीस आली, तर एका अल्पवयीन मुलीचेही जबरदस्तीने लैंगिक शोषण करण्यात आल्याने गर्भवती राहून तीची प्रसुती झाली. या दोन्ही धक्कादायक घटनेत पिडितांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हे नोंदविले आहे.

पहिली घटना पथ्रोट हद्दीत उघडकीस आली. 22 डिसेंबर रोजी रात्री 31 वर्षीय महिला घरात झोपली असताना, तिच्या घरात सुमित मुनीदास झोले (31, रा. काकडा, ता. अचलपूर) हा शिरला. त्यानंतर त्याने महिलेला झोपेतून उठवून तिला बदनामी करण्याची धमकी दिली. त्यानंतर त्याने महिलेशी जबरदस्तीने शारिरिक संबंध प्रस्थापीत केले. या घटनेची तक्रार महिलेने 22 डिसेंबर रोजी पथ्रोट पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी सुमित झोलेविरुध्द गुन्हा नोंदविला.

**लैंगिक अत्याचार पिडित मुलीची प्रसूती**

दुसरी घटना ही चांदुरबाजार पोलिस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. 17 वर्षीय मुलीवर स्वप्निल नामक तरुणाने जबरीने लैंगिक अत्याचार केला. त्यामुळे ती मुलगी गर्भवती राहीली. 14 डिसेंबर रोजी तिची प्रसृती झाल्यानंतर तीने एका मुलीला जन्म दिला. परंतू त्यानंतर तीची प्रकृती बिघडली आणि तिला अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात उपचाराकरिता दाखल करण्यात आले. या घटनेनंतर पिडित मुलीच्या बयाणावरून अमरावतीच्या राजापेठ पोलिसांनी आरोपी गुन्हा नोंदविला.

# अपहरण करुन तरुणाला मारहाण

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.23 )-** राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रवी नगर परिसरातील एका सेवा निवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांच्या मुलाला घरातून उचलून नेत मारहाण करण्यात आली. याप्रकरणात राजापेठ पोलिसांनी 7 आरोपीवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल केले असून, आरोपी भूपेंद्र उर्फ बोपी प्रमसिंग ठाकूर व मयूर अनिल गुज्जर (रा. भुतेश्वर प्लॉट) यांना अटक केली आहे.

### रविनगरातील घटना

ज्योती पाडुरंग तायडे यांच्या तक्रारीनुसार, त्या नर्स म्हणून काम करतात. त्यांचे पती पोलिस विभागातून सेवानिवृत्त झाले आहे. त्यांना दोन मुले असून, एक मुलगा नोकरी तर एक मुलगा शिक्षण घेत आहे. त्यांचा मुलगा शांतनु व बोपी ठाकुर यांचा पुतण्या याच्यात जुना वाद आहे. या वादातून आपसी समझौता झाला होता. त्यावेळी शांतनुने माफी सुध्दा मागितली होती. परंतू 22 डिसेंबर रोजी एका चारचाकी वाहनातून काही तरुण तायडे यांच्या घरी पोहोचले. त्यापैकी बोपी ठाकुरने शांतनुला आवाज देण्यास लावले. दरम्यान शांतनु हा घरी आला असता, त्याला बोपी ठाकुरसह त्याच्या अन्य साथीदाराने जबरीने पकडले आणि सोबत घेऊन गेले. शांतनु बराच वेळा घरी परतला नाही. त्यामुळे त्याच्या आईने राजापेठ पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली.

# पोळी पेक्षा भाकरीची महत्ता वाढली!

## ज्वारीच्या भाकरीने केला श्रीमंताशी ठाव





**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.23 )-** सध्या घरोघरी आहारात गहु निर्मीत चपाती, पोळी वापरत असले तरी कोरोना काळानंतर ज्वारीच्या भाकरीचे महत्व वाढल्याचे चित्र दिसुन येते. तृणधान्य असलेली ज्वारी ही वनस्पती गवताच्या पोएसी कुळातील असून तिचे शास्त्रीय नाव सो.र्घम बायकलर आहे. गहू, मका या वनस्पतीही याच कुळातील आहेत. ज्वारी मूळची उत्तर आफ्रिकेतील असून जगभरातील उष्ण आणि समशीतोष्ण प्रदेशांत मोठ्या प्रमाणावर तिची लागवड केली जाते. भारतात महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलगणा, तामिळनाडू आणि कर्नाटक या राज्यांत ज्वारीची व्यापारी स्तरावर लागवड करण्यात येते.

हरित क्रांती होण्या अगोदर पश्चीम विदर्भात सर्वांच्या आहारात समावेश होता. त्या काळी निव्वळ गावरान ज्वारीचे ऊत्पादन होत असे तेही अपुरेच. सोबत पंढरपुरी, नंतर मिलो ही लाल ज्वारी आली. हरित क्रांतीत संकरीत ज्वारी चे उत्पादीत वाण होताच गोरगरीबांच्या ताटात पोटभर भाकर दिसु लागली. सर्वसामान्याना लग्नकार्यासह सणासुदीला गव्हाची पोळी जेवायला मिळत होती. सिंचन सुविधा व आधुनिक तांत्रज्ञानाने शेतीला सुरुवात होताच गव्हाचे उत्पादन भरघोस होऊ लागले.

सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत रास्त भाव धान्य दुकानातून अल्पदरात विविध योजनेअंतर्गत नागरिकांना गव्हाचे वाटप झाल्याने पोळी ताटात दिसुन आली व भाकरी हद्पार झाली. कोरोना काळानंतर भाकरीचे महत्व वाढल्याने ज्वारीचा वापर वाढला. वन्यप्राण्यांच्या मुक्त संचार झाल्याने शेतकर्यावनी ज्वारीचा पेरा करणे बंद केले पर्यायाने ज्वारीचे उत्पादन बंद झाले असता ज्वारीची मागणी वाढली परीणामी दरातही वाढ झाली. गव्हाच्या तुलनेत ज्वारीला श्रीमंती आल्याचे दिसताच भाकरीचा तोरा वाढला आहे.

बहिरम यात्रेत हंडीचे मटन खाणारे खवय्ये भाकरीस पसंती देत असताना खानावळीसह हॉटेल मध्ये भाकरी बनवून महिला ही सक्षम झाल्या आहे. स्वत:ला सक्षम बनवताना तिने आपल्या कुटूंबाला देखील आधार दिला आहे.

### असे आहेत बाजारात दर

सध्या बाजार समितीत ज्वारी 1 हजार 980 ते 2 हजार 400 रुपये, तर सरासरी 2 हजार 200 रुपये भाव मिळत आहे. सफेद ज्वारी 2 हजार 925 ते 3 हजार 240 रुपये तर सरासरी 3 हजार 50 रुपये भाव मिळत आहे. दादर 2 हजार 133 रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्यात येत आहे.

### आरोग्यासाठी ठरते लाभदायक

बद्धकोष्ठता, मूळव्याध, अपचन, वजनवाढीच्या समस्यांपासून मुक्तीसाठी दादर आणि ज्वारीची भाकरी खाणे आरोग्यासाठी लाभदायक असते. रक्तवाहिन्यांतील कोलेस्टेरॉलची पातळी कमी करण्यासाठी ज्वारी उपयोगी पडते. आरोग्य जपायचे असेल तर ज्वारीची भाकरी खाणे गरजेचे आहे.


**CSB Bank** Trusted Heritage Smart Future

**PUBLIC NOTICE ON AUCTION OF PLEDGED GOLD ORNAMENTS**

The borrower/s in specific and interested bidders,in general, are hereby informed that on account of non-repayment of the Banks due by the borrowers as under despite the payment notice and recall/auction notice issued by the Bank, the gold ornaments pledged with the bank security by the respective borrowers for the loan availed by them will be sold in public auction on "as is where is" and "non-recourse" basis through e-auction portal http://csbgold.auctiontiger.net on 06th January 2025 at 10.30 AM. The auction may be adjourned to any other later date at the discreation of the bank upon publication of the same in the Bank's notice board. The borrowers are hereby further inform that the gold ornaments will be disposed of by private sale if the public auction is not successful and if there is a further balance to be recovered thereafter, legal action will be initiated against the borrower/s for recovery of the balance amounts due to the bank.In case of diseased borrower, all conditions will be applicable to legal heirs

| S. No. | Account Name | Client ID | No.of Acc. | Bal.Outstan-ding as on 22/12/2024 | Weight (grams) |
|---|---|---|---|---|---|
| BRANCH NAME : AMRAVATI | | | | | |
| 1 | SHYAM DWARKADAS MULANI | 4019743 | 001 | 35,305.06 | 7.40 |
| 2 | UMESH PRAKASH SAWANT | 4403056 | 001 | 32,176.36 | 6.50 |
| 3 | SULABHA SURENDRA BONDE | 4585790 | 001 | 51,546.63 | 10.50 |
| 4 | BHAVIKA ASHISH JOSHI | 7267670 | 004 | 13,19,068.26 | 261.20 |
| BRANCH NAME : AKOLA | | | | | |
| 5 | HANIF SHAH USMAN SHAH | 3353862 | 002 | 64,089.65 | 15.44 |
| 6 | ASIF KHAN ARIF KHAN | 3374665 | 001 | 52,025.48 | 14.59 |
| 7 | MANISHKUMAR ASHOK KOTHARI | 3493385 | 004 | 15,79,192.82 | 292.58 |
| 8 | NILESH RAMESHWAR DAHAKE | 4137967 | 001 | 2,97,379.74 | 52.48 |
| 9 | SACHIN PANDHARI GHAWAT | 4463527 | 001 | 13,979.13 | 3.60 |
| 10 | KHAN TABISH AFZAAL IQBALULLAH KHAN | 4499752 | 001 | 26,06,952.21 | 466.96 |
| 11 | AMINA SHAIKH SHAKIL GOURVE | 4581511 | 001 | 33,031.70 | 9.07 |
| 12 | SHEKH JUNED SHEKH NASIR | 4881511 | 001 | 66,217.74 | 12.47 |
| 13 | SHRUTI MILIND PATEL | 4889775 | 001 | 1,37,314.84 | 26.40 |
| 14 | SUDHIR BHIMRAO PETE | 7479313 | 002 | 4,72,530.88 | 85.44 |
| 15 | NITA PRASHANT VYAWHARE | 7516434 | 002 | 23,40,005.58 | 421.06 |
| 16 | MEHNAZ KHAN TABISH AFZAAL KHAN | 7726073 | 001 | 16,75,700.31 | 304.93 |

For more details/account wise information borrowers/interested bidders may contact respective branches and for participating in the auction, please visit/login to the e-auction portal http://csbgold.auctiontiger.net

AMRAVATI - AKOLA | 24.12.2024 Sd/- Authorized Officer, CSB Bank


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# आलेला निधी तातडीने खर्च करुन नविन मागणी नोंदवा!

## जिल्हा नियोजनमधील निधीकरिता जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन





### सुशासन सप्ताह प्रभावीपणे राबवा!

केंद्र शासनातर्फे सुशासन सप्ताह राबविण्यात येत आहे. हा सप्ताह प्रभावीपणे राबवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले. नागरिकांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी ई-ऑफीसचा अवलंब करावा, असे आवाहन केले. कार्यालयातील प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन तातडीने निकाली काढण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे. तसेच कार्यालयातर्फे करण्यात आलेल्या चांगल्या कामांची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावी, असे निर्देश दिले.

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.23 )** - जिल्हा नियोजनमधील वितरीत करण्यात आलेला निधी तातडीने खर्च करावा, तसेच आवश्यक असलेल्या निधीची मागणी तातडीने नोंदवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजनचा आढावा घेण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, जिल्हा नियोजन अधिकारी अभिजित मस्के आदी उपस्थित होते.

कटियार यांनी, निवडणुकीपूर्वी मान्यता घेऊन सुरू करण्यात आलेली कामे चालू ठेवावीत. परंतू ज्या कामांच्या निविदा झालेल्या नाहीत, अशा कामांची आवश्यकता तपासून कामे सुरू करावीत. प्रामुख्याने शाळा दुरूस्तीची कामे तातडीने सुरू करावीत. रस्ते, आरोग्य विभागाच्या कामांचे दायित्व मोठ्या प्रमाणावर असते. त्यामुळे खर्च होऊ शकतील, अशाच कामांचे दायित्व सादर करावेत. तसेच मागील दायित्व पूर्ण करून नवीन कामे घेण्यात यावीत.

यावर्षीचा निधी खर्च करण्यासाठी तीन महिन्याचा कालावधी शिल्लक राहिला आहे. त्यामुळे एक महिन्याच्या आत प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.

प्रशासकीय मान्यता घेतली नसल्यास निधी इतर विभागाकडे वळता करण्यात येतील. मान्यता दिलेली कामे निविदा प्रक्रिया करून सुरू झाली असल्यास अशी कामे पूर्ण होतील, यासाठी प्रयत्न करण्यात यावे. यामुळे जिल्हा नियोजनचे चित्र चांगले दिसण्यास मदत होईल.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनपटाचे नाटिकेद्वारा सादरीकरण






**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.23 )**- स्थानिक ऊर्गेन संघरक्षित इंटरनॅशनल स्कूल मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली म्हणून त्यांचा संपूर्ण जीवनपट नाटीकेद्वारे मांडण्यात आला.

दिनांक 15 डिसेंबर 2024 रोजी शिक्षणाधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम, धम्मचारी अमोघसिद्धी, तसेच धम्मचारी कुलचंद्र यांच्या उपस्थितीत शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन पार पडले. धम्मचारी रत्नराज संदीप रक्षित यांच्या संबोधनाने आनंददायी वातावरणात कार्यक्रमाची सुरुवात झाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्माचा सोहळा, पाण्याचा प्रसंग, चवदार तळ्याचा प्रसंग, शाळेतील प्रसंग, रमाई सोबतचा क्षण, हिंदू कोड बिल प्रसंग, गाडगे महाराजांसोबत ची भेट, धम्मदीक्षा, काळाराम मंदिर प्रसंग, अशा प्रकारे एकूण 22 घटनांवर नाटिका आणि नृत्य प्रेक्षकांसमोर सादर करण्यात आले. अनेक प्रेक्षक राजरत्नचा मृत्यू, रमाई क्षण, महापरिनिर्वाण क्षण या नाटिकेमध्ये भावनिक झालेले दिसून आले. मुलांचे नाटिका व नृत्य पाहून प्रेक्षक मंत्रमुग्ध झालेले दिसून आले. जन्माचा सोहळा, लग्नाचा सोहळा पाहून प्रेक्षक भारावून गेले. जन्मापासून ते महानिर्वाणापर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट दाखवून विद्यार्थ्यांनी एक नवीन रेकॉर्डच करून दाखविला. पाच तास चाललेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांना त्यांच्या जागेवर जणू खिळून ठेवले होते. कार्यक्रमाला नागसेन ज्ञान प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा धम्मचारीणी पद्ममणी तसेच आनंद शाळेच्या मुख्याध्यापिका धम्मचारिणी श्रद्धामाला, तसेच आनंद हायस्कूलच्या शिक्षिका वंदना रक्षित उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन वैशाली शेंडे तसेच आदिती कांबळे यांनी केले. संपूर्ण जीवनपट सादरीकरणासाठी सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका प्रवीणा चिंचोळे यांनी अथक परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. स्मिता रक्षित यांच्या संकल्पनेतील या कार्यक्रमाला सर्व विद्यार्थी, शिक्षक व पालकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

# स्व. घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा 4 ला

## राजकीय स्वार्थासाठी दिल्या जाणाऱ्या योजना लोकशाहीस घातक आहे या विषयावर होणार स्पर्धा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.23 )**- स्व.माणिकराव घवळे स्मृती प्रतिष्ठान आणि डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा शनिवार दि. 4 जानेवारी 2025 रोजी आयोजित करण्यात आली आहे.



राजकीय स्वार्थासाठी दिल्या जाणाऱ्या योजना लोकशाहीस घातक आहे या विषयावर ही स्पर्धा रंगणार आहे. 4 जानेवारी 2025 रोजी डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाच्या सभागृहात सकाळी 10:30 वाजता या स्पर्धेला प्रारंभ होईल.

या स्पर्धेचे फेसबुक, युट्यूब च्या माध्यमातून थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. स्पर्धेत विजेता संघाला स्व. माणिकराव घवळे स्मृती फिरता चषक प्रदान करण्यात येईल.विषयाच्या अनुकूल व प्रतिकूल बाजूस मते मांडणाऱ्या दोन स्पर्धाचा संघ स्पर्धेसाठी पात्र ठरेल. स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या संघाला 11001 रु. रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र आणि फिरता चषक देऊन गौरविण्यात येईल. वैयक्तिक गटात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्याला 7001 रु. रोख सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक 5001 रु. रोख सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, तृतीय पुरस्कार 3001रोख सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येणारआहे. तर उत्तेजनार्थ पारितोषिक म्हणून 2001 रु रोख व प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. या स्पर्धेचे हे 23 वे वर्ष असून, स्पर्धेच्या माध्यमातून महत्वपूर्ण विषयावर मत मांडण्याची संधी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्राप्त होणार आहे. विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र येथील नावाजलेले वादविवादपटू या स्पर्धेचे परीक्षण करणार आहेत. ही स्पर्धा नि:शुल्क असून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख, संयोजक प्रफुल्ल घवळे व आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीकरीता डॉ. शीतलबाबू तायडे, 9822527808, डॉ. अमित गावंडे 9422943298, प्रा. रणजित देशमुख 997577818, मयुर चौधरी 7798060500, रत्नाकर शिरसाट 8857911036 यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## दिलीप टारपे यांचे निधन



**अंजनगाव बारी**- बारी समाजाचे कार्यकर्ते तसेच श्री तीर्थक्षेत्र कोंडेश्वर देवस्थानचे विद्यमान उपाध्यक्ष दिलीप नामदेवराव टारपे (60) यांचे अल्पशा आजाराने (दि.23) दुपारी पाच वाजता दु:खद निधन.त्याच्या पश्चात पत्नी, तीन मुली ,नातूपंतू असा बराचसा आप्तपरिवार आहे. ते न्यु एज्युकेशन सोसायटी बडनेराचे उपाध्यक्ष राजेश टारपे यांचे घाकटे भाऊ होते.

## फ्लॅटमधून 80 हजारांचा मुद्देमाल लंपास

**अमरावती**- गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीतील शेगाव नाका परिसरातील एका अपार्टमेंट मधील फ्लॅटमधून 80 हजारांचा मुद्देमाल लांबविण्यात आला. ही घटना 22 डिसेंबर रोजी उघडकीस आली. शेगाव नाका येथील विनय पार्क अपार्टमेंट मधील रहिवासी सुमेध धारिया (45) यांच्या फ्लॅटच्या बाथरूममधील खिडकीचा काच काढून चोरट्याने आत प्रवेश करीत 2 लॅपटॉप, कॅमेरा व 10 हजार रुपये रोख असा 80 हजारांचा मुद्देमाल लांबविला.

# सामाजिक कार्यातून अण्णासाहेब साबळेंना श्रध्दांजली



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी,( दि.23 )**- विदर्भ संघ मुंबईचे संस्थापक तथा विदर्भातील प्रख्यात सामाजिक कार्यकर्ते स्व. सुधाकरराव उर्फ अण्णासाहेब साबळे याचे अल्पशा आजाराने मुंबई येथिल खाजगी रुग्णालयात नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता वाऱ्यासारखी पसरताच मुंबईत स्थायिक असलेल्या विदर्भ वासीयांवर मोठा दुखाचा डोंगर कोसळला. हजारो विदर्भवासीयांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली दिली. अण्णा साहेबांना लहाणपणा पासुनच समाज कार्य करण्याची आवड असल्याने त्यांच्या साबळे कुंटूबियांनी त्यांची दशक्रिया, तेरवी असे कोणतेही सोपस्कार न करता अंजनगाव येथील स्व.दिगंबरराव पेटकर आश्रम शाळेतील आदिवासी विध्यार्थांकरीता खेळणे भेट देऊन त्यांचे अधुरे स्वप्न पुर्ण करण्याचा मानस केला होता. नुकताच 21 डिसेंबर 24 ला स्व. दिगंबरराव पेटकर आश्रम शाळेत स्मृतिषेश कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रविण पेटकर तर उदघाटक म्हणून महिला शिवसेना संपर्क प्रमुख चंद्रपुर (ठाकरे गट) सुषमा साबळे, जेष्ठ पत्रकार सुरेश साबळे, शारदा पत संस्था. संचालिका स्नेहलता साबळे, मुख्याध्यापिका नयना हाडोळे, उद्योजिका चंदा वानखडे, कंत्राटदार अजिंक्य साबळे, दिलीप साबळे, योगिता साबळे मुख्याध्यापिका गणोरकर विद्यालय पथ्रोट, जीया साळळे हे प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन वर्षो पेटकर तर आभार प्रदर्शन जयेंद्र गाडगे यांनी केले. या प्रसंगी कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता शाळेचे अधिक्षक अमोल हाडोळे, मुकेश वानरे, चक्रधर दुधरकर, विठ्ठल पखाले, मधुर जाधव यांनी महत्वाची भुमिका बजावली.

# शेतकऱ्याच्या नशिबी निराशाच

## ■ कड्याक्याची थंड आणि शेतकरी यांची लढाई
## ■ थंडी मुळे संत्रा, गहू, तूर पिकाचे अधिक नुकसान



**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर बाजार,( दि.23 )**- थंडी ही तालुक्यातील शेतकरी यांच्या चांगलीच जीवावर उठली असल्याचे चित्र आहे. मागील वर्षी अधिक प्रमाणात झालेला पाऊस आणि त्यामुळे झालेले नुकसानातून बाहेर निघण्याचा प्रयत्न करणाऱ्या शेतकऱ्यांवर हे नविन संकट उभे ठाकत आहे. तूर पिकांवर अज्ञात रोग पडल्याने तूर पीक जागीच जळून गेली आहे. दुसरीकडे कापसावर बोंडअळी नावाचे संकटही आ वासून उभे आहे. नवीन वर्षाच्या सुरुवातीला आलेले ढगाळ वातावरण आणि त्यानंतर ची थंडी यांचा फटका चांदुर बाजार तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना बसला आहे.

सध्या चांदुर बाजार तालुक्यात संत्रा, गहू, कांदा लागवड पीकावर शेतकऱ्याची भिस्त आहे. यात महावितरण कडून रात्री पाळीला होत असलेल्या वीजपुरवठ्यामुळे शेतकरी आधीच संकटात आहे. थंडी मुळे संत्रा झाडावरील आंब्याचा बहरही फुटला नाही. दुसरीकडे गहू अधिक थंडीमुळे परिपक्व होण्याआधी उमबी निघत आहे. त्यामुळे याचा परिणाम हा उत्पादन वर होणार आहे. अज्ञात रोगांमुळे तूर ही उभी असताना वाळून गेली. त्यामूळे तुरीचे उत्पन्न घटेल यात दुमत नाही. तालुक्यातील दोन मंडळ आता कोठे अतिवृष्टी मध्ये समाविष्ट करण्यासाठी चा प्रस्ताव पाठवला आहे. पीक विमा अजून मिळण्याच्या प्रतीक्षेत आहे. मार्च महिन्यात कर्जाचा हप्ता आहे. यामुळे शेतकऱ्यांसमोर अस्मानी आणि सुल्तानी असे संकट उभे ठाकले

ना पीक विमा, ना अतिवृष्टी मदत, ना अनुदान वाटप, तूर वाळली, कपाशी वर रोग हमीभाव नाही, संत्रा फळबाग वर रोग, रात्रीला वीजपुरवठा त्यात नादुरुस्त रोहित्र. खरचं शेतकरी जगला पाहिजे असे कोणाला वाटते का? हा संशोधनाचा विषय आहे. निवडणूक आली की, सत्तेवर असणारे आणि नसणारे यांना शेतकरी आठवतात. निवडणूक आली की, शेतकऱ्यांच्या समस्यांचा यांना विसर पडतो. नैसर्गिक संकटांपेक्षा कृत्रिम संकटांचे आव्हान शेतकऱ्यांमोर मोठे आहे.

**प्रमोदराव अंबाडकर, कुऱ्हा, शेतकरी.**



पीक विमा, गारपीट मदत, त्यात 50 हजार प्रोत्साहन अनुदान निधी या सर्वात नुकसान झाले, ते केवळ शेतकरी यांचे सरकार कोणतेही असो वेठीस धरले जाते. शेतकऱ्यांना केवळ पिकविन्याचा नाही. तर खाणाऱ्यांचा विचार आधी केला जातो. यावेळी अधिवेशनात कुणीच शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बोलताना दिसले नाही. त्यामुळे निवडणूक आली की, यांना शेतकरी आठवतो का? असा संतप्त सवाल चांदुर बाजार तालुक्यातील शेतकरी वर्ग करित आहे.

### संत्रा फळबागवर संशोधन कधी?

संत्रा फळबाग वर संशोधन झाले नाही. संत्रा झाडाला लागलेले संत्रा गळू लागले आहे. याबाबत वारंवार आंदोलन झाले. मात्र दखल कुणीच घेतली नाही. शेवटी शेतकऱ्यांनी शासन, प्रशासनाची दशक्रिया करत संत्रा फळबाग या काढायला सुरुवात केली. संत्राबागा नष्ट होतील, उत्पन्न घटेल तेव्हा संत्र्याला भाव मिळतील असे चित्र दिसत आहे.

# खगोल शास्त्रातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील नासो परीक्षा



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.23 )**- शहरातील स्टार किड्स कार्निवल स्कूल येथे भारतासह इतर 20 देशांमध्ये घेतली जाणारी नासो (नॅशनल अॅस्ट्रॉनॉमी अँड सायन्स ओलंपियाड) ही परीक्षा नुकतीच घेण्यात आली. खगोलशास्त्राशी संबंधित जगातील एक महत्त्वाची परीक्षा अशी या परीक्षेची ख्याती असून या परीक्षेमधून सर्वोत्तम येणाऱ्या विद्यार्थ्यांना नासा अमेरिका व इस्त्रो सारख्या संशोधन संस्थेला भेट देण्याची संधी प्राप्त होत असते. या परीक्षेमध्ये वरुड तालुक्यातील जागृत विद्यालय वरुड ,नॅशनल इंग्लिश स्कूल, स्कूल ऑफ स्कॉलर, न्यू ऑरेंज सिटी इंग्लिश स्कूल, डॉ. हेमा पाटील इंग्लिश स्कूल (जरूड), वसंतराव नाईक हायस्कूल (जरूड), जनता विद्यालय (शेंदुरजना घाट), कॅलिफोर्निया इंग्लिश स्कूल (बेनोडा), शांतिनिकेतन इंग्लिश स्कूल (वरुड), जागृत विद्यालय (एकदरा) येथील वर्ग दोन ते पाच दोन ते दहा च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. परीक्षेचे आयोजन प्रा.उमेश बंड, सुचिता बंड यांनी केले होते. तर परीक्षे करिता विविध शाळेतील शिक्षक चेतन डोंगरे, मुख्याध्यापक झोड, योगेश वानखडे, महिला शिक्षक खंडाळे, आलासपूरे, प्रतिभा राऊत, बुरांगे, शिक्षक अविनाश दुर्गे, वसुले यांनी सहकार्य केले. स्टार किड्स टीचर श्रुती गायकवाड, अंकिता पाटील, साक्षी हिवसे, सोनाली बारमासे, शिवानी राबडे यांनी परिश्रम घेतले.

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी माझे पक्षकार नामे संगीता विलास चव्हाण यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येने प्रमाणे,

मिळकतीचे वर्णन - मौजे चमक खुर्द, ग्रामपंच्यायत जूना मालमत्ता क्रं. 242/B, गाव नमूना 8 नुसार नवीन मालमत्ता क्रं. 328, ता. अचलपूर, जिल्हा. अमरावती.

चतु: सीमा: पूर्व- रामेश्वर सोळंके यांचे घर, उत्तर- अनिल पवार यांचे घर

पश्चिम- रस्ता, दक्षिण- रस्ता.

सदर मिळकत नामे 'संगीता विलास चव्हाण' यांना ग्रामपंच्यायत चमक खुर्द. यांचा तपशील आणि गाव नमूना 8 नुसार त्यांच्या मालकीची आहे तसेच वरील वर्णनाची नमूद मालमत्ता ही वडीलोपार्जित आहे. त्यानंतर त्यांनी 'PIRAMAL CAPITAL & HOUSING FINANCE LTD. BR AMRAVATI. येथे गृह कर्जाकरीता अर्ज केलेला आहे. वरील नमूद मालमत्ता कुठे गहान/राष्ट्रीयकृत/खाजगी/पतसंस्था/सहकारी/इतर बँक बोजा, सदर मालमत्तेवीषयी शासकीय-नीमशासकीय इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली दिलेल्या माझ्या मो. नं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 (सात) दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

शिक्का

आपला
Advocate
रवींद्र र वाटाणे स्नेहगंधा कॉलनी,
अमरावती मो. नं. 9823698745

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीस द्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की अर्जदार ज्ञानेश्वर उकर्डाजी ढेंगे रा. अंजनगांव सुर्जी ता. अंजनगांव सुर्जी जि.अमरावती येथील कायमचा रहीवाशी आहे. त्यांच्या जन्माची नोंद नगरपरीषद कार्यालय अंजनगांव सुर्जी येथे रजिस्टरमध्ये जन्माची नोंद नसल्याने त्यांनी जन्म/मृत्यू अधिनियम १९६६ चे कलम १३ (३) अन्वये मृत्यू च्या नोंदीचे आदेश होण्याकरीता दिनांक १४/१०/२०२४ रोजी विनंती अर्ज या कार्यालयात सादर केला आहे.

त्यामुळे अर्जदारांनी दिलेल्या अर्जावरून जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात येत आहे. ज्ञानेश्वर उकर्डाजी ढेंगे हे कायमचे रहीवाशी आहे. त्यांचा जन्म दि. ०३/०६/१९५५ रोजी त्यांच्या राहत्या घरी मौजा अंजनगांव सुर्जी ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथे झाला आहे. त्याबाबत कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार असल्यास किंवा प्रकरणात काही म्हणावयाचे असल्यास त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत स्वत: अथवा आपल्या अधिवक्ता मार्फत लेखी म्हणने सादर करावेत अन्यथा ३० दिवसानंतर जर कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार प्राप्त झाल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

कोर्ट शिक्का

(रविंद्र काळे)
निवासी नायब तहसीलदार
अंजनगांव सुर्जी